# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




● परीक्षा व मूल्यमापन मंडळ ● Board of Examinations and Evaluation ●

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमम/
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 6 APR 2021

परिपत्रक क्र.२७/२०२१

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य/प्राचार्या यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दिनांक २५/०३/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव क्र. ०८ पारीत झालेला आहे.

**कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमास (एम.ई) शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ई) पूर्ण करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आलेली आहे व यापुढे अशी मुदतवाढ देण्यात येणार नाही.**

उपरोक्त नमुद ठरावास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एम.ई अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे आणि सदरील अभ्यासक्रमातील सत्र I, II व III ची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून एम.ई सत्र IV चा शोधनिबंध विहित शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करण्यास १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एम.ई अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येत असलेने अशा विद्यार्थ्यांना सत्र ४ चा शोधनिबंध सादर करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब, वरील परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच अभ्यासक्रमाशी निगडीत सर्व घटकांच्या निदर्शनास आणून देऊन विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ.वि.एल.कदम)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूवि/एम.ई/३१२/२०२१

दिनांक : 6 APR 2021

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित:**
प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.